2022-23

# RTM Nagpur University Nagpur

## NSS Regular Activities Report

**College**

**S.S.N. J. Mahavidyalaya, Deoli Dist-Wardha 442101**

**एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी**

**राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक नियमित कार्यक्रम**

**अहवाल २०२२-२३**

### 1. 6 जून 2022 शिवस्वराज्य दिन

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण  दिनांक ३ जून २०२१ नुसार ०६ जून २०२२ हा *शिवस्वराज्य दिन* महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन व माल्यार्पण करून महाराष्ट्र गीत गायन करण्यात आले. या शिव स्वराज्य दिन साजरा करताना महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



2. **अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा**

**दिनांक 12 ऑगस्ट 2022**

आमच्या महाविद्यालयामध्ये अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा व संकल्प परिपत्रकाचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. पी. ढाले व रासेयो अधिकारी प्रा.एस.डी.मोहधरे यांनी अमली पदार्थाचा हानिकारक परिणाम याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेतली.





**3. हर घर तिरंगा जनजागृती अभियान दिनांक 13/8/2022**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयातर्फे देवळी शहरात हर घर तिरंगा जनजागृती कार्यक्रम व रॅली,प्रभात फेरी आयोजित करण्यात आली. यात महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले.



**देवळी शहरात हर घर तिरंगा जनजागृती रॅलीचे नेतृत्व करताना प्राचार्य डॉ. पी. पी. ढाले**


राष्ट्रीय छात्र सेना
SUB-UNIT





4. **वक्तृत्व स्पर्धा**

**14 ऑगस्ट 2022**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त एस एस एन जे महाविद्यालय देवळी येथील राष्ट्रीय सेवा योजना तर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. ढाले सर परीक्षक म्हणून टी. एम. मॅन्यूअल सर, शेख सर ,चुटके मॅडम, मोरे मॅडम व उपस्थित होती. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुनील राठी सर यांनी केले व आभार ऋषिकेश मोहिते यांनी मानले.

**वक्तृत्व स्पर्धेत विजेते**

**ऋषिकेश मोहिते बीए भाग ३**

**पुनम चंदनखेडे बीए भाग १**

5. **उद्योजकता विकास**

**दिनांक 19 ऑगस्ट 2022**

राष्ट्रीय सेवा योजना व एमसीवीसी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता उद्योजकता विकास या विषयावर मार्गदर्शन करणारी चमू उपस्थित झाली होती. त्यांनी देशातील वाढता बेरोजगारीवर उपाय म्हणून नवयुवक हा उद्योजकेकडे वाढावा या हेतूने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.










**प्राचार्य डॉ. ढाले सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**

6. **आंतरराष्ट्रीय युवा दिन व एड्स जनजागृती कार्यक्रम**

**दिनांक 25 ऑगस्ट 2022**

**एस एस एन जे महाविद्यालय व** सामान्य रुग्णालय वर्धा येथील **आयसीटीसी विभाग** व नोबल शिक्षण संस्था वर्धा च्या वतीने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपस्थित विजय ओझा कार्यक्रम अधिकारी संतोष मोहदरे, व इतर सर्व प्राध्यापक व आरोग्य विभागाचे कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.







**आरोग्य तपासणी करताना राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका**




**सर्व विद्यार्थी व प्राध्यापक प्रतिज्ञा घेताना**




**कार्यक्रमाधिकारी प्रा.एस.डी.मोहधरे प्रास्ताविक करताना**

## 7. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

दरवर्षी नियमितपणे महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य ढाले, कार्यक्रमाधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना चे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक मुंगल सर,राठी सर,नीलिमा बर्गट,गजभिये मॅडम व गोडे सर उपस्थित होते.




कार्यक्रमाधिकारी प्रा.एस.डी.मोहधरे प्रास्ताविक करताना




प्राचार्य डॉ. ढाले सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




**8. गांधी जयंती**

**02 ऑक्टोबर 2022**

**गांधी जयंती निमित्त** महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांनी श्रमदान करून महाविद्यालयीन परिसर स्वच्छ केला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यालय हे सुद्धा स्वयंसेवकांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे स्वच्छ केले. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून व पूजन करून सर्वांनी अल्पोहार केला.




**राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यालय**

**9. राष्ट्रीय एकता दिन 12/11/2022**

राष्ट्रीय एकता दिन निमित्त महाविद्यालयात राजे तर्फे कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष इंग्रजी विभाग प्रमुख टी.एम.मॅन्यूअल प्रमुख वक्ते प्राध्यापक किरण पावणे, मराठी विषयाचे प्राध्यापक राहुल राऊत खेळ विभाग प्रमुख मंगल सर गृह अर्थशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. नीलिमा बर्गट उपस्थित होत्या.




**प्रा. किरण पावणे, मराठी विषयाचे प्रा. राहुल राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**






**कार्यक्रमाचे अध्यक्ष इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. टी.एम.मॅन्यूअल**



**10. शैक्षणिक क्षेत्रीय भेट**

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने व व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांच्याकरिता क्षेत्रीय शैक्षणिक भेट हिंगणघाट  येथील पी व्ही टेक्स्टाईल कंपनी मध्ये करण्यात आली.




Pee Vee Textile Company, Hinganghat




पी. व्ही. टेक्स्टाईल कंपनी, हिंगणघाट



**11.भारतीय संविधान दिन**

**२६ नोव्हेंबर २०२२**

महाविद्यालयात 26 नोव्हेंबर संविधान दिवस म्हणून साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला अध्यक्ष प्रभारी प्राचार्य झाले सर व संविधान या विषयावर बोलणारे राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक जगदीश यावले सर उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक संतोष मोहदरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करून घेतले. नवीन भारत घडवण्याची ताकद भारतीय संविधानात आहे. त्याचबरोबर देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची तयारी संविधानात आहे. या कार्यक्रमाला उपस्थित सांस्कृतिक समिती सचिव ग्रंथपाल कांबळे मॅडम यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.




रासेयो कार्यक्रम अधिकारी एस.डी. मोहधरे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करताना.




**प्राचार्य डॉ. ढाले सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**

**12. सात दिवसीय विशेष निवासी शिबिर सोनेगाव आबाजी येथे आयोजित**

**दिनांक 5 जानेवारी ते 11 जानेवारी 2023**

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर सोनेगाव आबाजी तालुका देवळी येथे आयोजित करण्यात आले. रोज सकाळी प्रार्थना, योगासने, प्राणायाम, प्रभात फेरी, श्रमदान आणि दुपारी प्रबोधन सत्रात विविध बौद्धिक कार्यक्रम तज्ञ मार्गदर्शकाद्वारे होत होती. व सायंकाळी विद्यार्थ्यांची सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आली.

श्रमप्रतिष्ठा बरोबरच विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनता जागृत व्हावी : समिरभाऊ देशमुख श्रमप्रतिष्ठा बरोबरच विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनता जागी व्हावी असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीरात यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. समिरभाऊ देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना केले आहे.

एस.एस.एन.जे महाविद्यालय देवळी आणि सोनेगाव आबाजी यांच्या संयुक्त विद्यमाने रा.सो.यो. योजनेचे युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या संकल्पनेवर आधारित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबीर सोनेगाव आबाजी या ग्रामस्थांनी आयोजित केले होते.या सात दिवसीय शिबिरात रोज सामुदायिक प्रार्थना, प्राणायाम, योगासने, सकाळी प्रभात फेरी, जागर गीते, घोषवाक्य , श्रमदान, प्रबोधन सत्रे, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम होत होते.

या शिबिरात प्रबोधन सत्रामध्ये शेषराव बावनकारांनी युवकांपुढील आव्हाने व उपाय, सुमित उरकुडकर यांनी ट्रुथ फॉर यूथ, डॉ. संदीप काळे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दशा आणि दिशा, सतीश दाणी यांनी ग्रामीण युवक व शेती, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, विजय ओझा यांनी एच आय व्ही आणि युवक, अमोल गाढवकर यांनी स्वामी विवेकानंद व आजचा युवक, सामाजिक सशक्तीकरण शैक्षणिक संस्थेचे सचिव प्रा. राहुल राऊत यांनी स्पर्धा परीक्षा आणि आजचे तरुण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर तज्ञांनी प्रबोधन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

या शिबिरात गावकऱ्यांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा यांच्या सौजन्याने आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले तसेच सौ. वैशाली ताई येरावार यांच्या अध्यक्षतेखाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्राम सर्वेक्षण केले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे यांनी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीरभाऊ देशमुख, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले, जयवंतराव येरावार, सौ. वणीताताई डफरे, किशोर राऊत,श्याम भोयर, महादेवराव निकम, ज्ञानेश्वर भोयर,मनोजभाऊ दिघीकर, अंकित भोयर, प्रा. राहुल राऊत यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या समारोपीय कार्यक्रमासाठी गावातील नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




सकाळी प्रभात फेरी, जागर गीते  घोषवाक्य



प्राणायाम, योगासने




शिबिरात रोज सामुदायिक प्रार्थना




श्रमदान




सोनेगाव आबाजी येथील अंगणवाडी परिसर स्वच्छता




आरोग्य तपासणी शिबीर

# विविध वृत्तपत्रातील बातम्या

## राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रसेवा विकसनाचे साधन : समीर देशमुख

देशोन्नती वृत्तसंकलन...

**सेलू** ■ राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रसेवा विकसनाचे मूलभूत साधन असून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात सामाजिक कार्य व सामाजिक दायित्व यांची जाणीव निर्मितीसाठी अनन्य साधारण आहे. तसेच रासेयोचे विशेषत: शिबिर विद्यार्थ्यांना सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविण्यासाठी एक महत्वपूर्ण मंच म्हणून उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा परिपूर्ण अवलंब करावा, असे मत यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी रासेयो शिबिराच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले.

यशवंत महाविद्यालय सेलू, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर संत केजाजी महाराज भक्त निवास, घोराड येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिराचा समारोपीय कार्यक्रम समीर देशमुख (अध्यक्ष, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून डी. बी. पाणबुडे (गटविकास अधिकारी,पंचायत समिती, सेलू ) व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना डहाणे उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमात समीर देशमुख यांनी शिबिरातील स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. त्यांना मार्गदर्शन केले. गावागावात जाऊन कॅम्प घ्यावा आणि नागरिकांना मदत करावी



अशी आशा व्यक्त केली. शिबिरातून घेतलेल्या मार्गदर्शनाचा तुम्ही तुमच्या आयुष्यात फायदा करून घ्यावा अश्या शुभेच्छा दिल्या.

डी. बी. पाणबुडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाकाही अडचणी आल्यास आम्ही मार्गदर्शन करण्यास तयार आहोत, अशी ग्वाही दिली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अर्चना डाहाणे, शिबिराचे अहवाल वाचन शीतल बावीसताले यांनी केले. शिबिरात क्षयरोग विभागाचे डॉ. प्रशांत वाडीभस्मे आणि त्यांचे इतर सहकारी यांनी विद्यार्थ्यांना क्षयरोगावर जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच घोराड व इतर गावातील नागरिकांकरिता दंतरोग निदान व सामान्य आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. याकरिता विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सेलू यांच्या संपूर्ण टीमने शिबिरात सहकार्य केले. ता.प्र.

## श्रमप्रतिष्ठेबरोबरच सृजनता जागृत व्हावी

### श्रमसंस्कार शिबिरात समीर देशमुख यांनी व्यक्त केली अपेक्षा

**वर्धा, ब्युरो.** श्रमप्रतिष्ठेबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनता जागी व्हावी, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजनेच्या 7 दिवसीय श्रमसंस्कार शिबिरात यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना केले.

एसएसएनजे महाविद्यालय देवळी आणि सोनेगाव आबाजी यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो योजनेचे युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या संकल्पनेवर आधारित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर सोनेगाव आबाजी या ग्रामस्थांनी आयोजित केले होते. या सात दिवसीय शिबिरात रोज सामुदायिक प्रार्थना, प्राणायाम, योगासने, सकाळी प्रभात फेरी, जागर गीते, घोषवाक्य, श्रमदान, प्रबोधन सत्रे, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम होत होते. या शिबिरात प्रबोधन सत्रामध्ये शेषराव बावनकारांनी युवकांपुढील आव्हाने व उपाय, सुमित टाकरकर यांनी टुथ फॉर यूथ, डॉ.



संदीप काळे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दशा आणि दिशा, सतीश दाणी यांनी ग्रामीण युवक व शेती, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, विजय ओझा यांनी एच आय व्ही आणि युवक, अमोल गाढवकर यांनी स्वामी विवेकानंद व आजचा युवक, सामाजिक सशक्तीकरण शैक्षणिक संस्थेचे सचिव प्रा. राहुल राऊत यांनी स्पर्धा परीक्षा आणि आजचे तरुण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर तज्ञांनी प्रबोधन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे यांनी यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीरभाऊ देशमुख, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले, जयवंतराव येरावार, वणीता डफरे, किशोर राऊत, श्याम भोयर, महादेवराव निकम, ज्ञानेश्वर भोयर, मनोज दिघीकर, अंकित भोयर, प्रा. राहुल राऊत यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. या समारोपीय कार्यक्रमासाठी गावातील नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरोग्य तपासणी शिबिर, महिला मेळावा

या शिबिरात गावकऱ्यांसाठी जिल्हा सामान्य रूग्णालय वर्धा यांच्या सौजन्याने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच वैशाली येरावार यांच्या अध्यक्षतेखाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्राम सर्वेक्षण केले.

लोकमत

# ग्रामीण भागातील युवकांमध्ये संघर्षाची क्षमता अधिक असते

## सुमित उरकुडकर : श्रमसंस्कार शिबिर



लोकमत न्यूज नेटवर्क

**देवळी :** ग्रामीण भागातील युवकांमध्ये परिस्थितीची जाणीव असते, त्यामुळे या युवकांत संघर्षाचा सामना करण्याची क्षमता असते. युवकांनी तारुण्यात मनाच्या विरुद्ध जगावे, त्यामुळे येणारे भविष्य उज्ज्वल होईल, असे मत सुमित उरकुडकर यांनी 'टूथ फॉर यूथ' या विषयावर मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

देवळी येथील एस.एस.एन.जे. महाविद्यालय आणि सोनेगाव (आबाजी) येथील ग्रामस्थांच्यावतीने 'युवकांचा ध्यास ग्राम-शहर-विकास' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार निवासी शिबिर आयोजित केले आहे. आबाजी महाराज देवस्थानात हे शिबिर सुरू असून या शिबिरादरम्यान विविध मान्यवरांचे मार्गदर्शन कार्यक्रम घेतले जात आहेत. प्रबोधन सत्रामध्ये 'युवकांपुढील आव्हाने व उपाय' या विषयावर डॉ. शेषराव बावनकर यांनी "सर्वधर्म समभाव, मानसिक एकाग्रता, संघटन कौशल्य" ही मूल्ये बोध कथा आणि उदाहरणे देऊन विशद केली.

'संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयासंबंधी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी मराठी संत साहित्याची मांदियाळी विशद करून संतांबद्दल जे चमत्कार सांगितले जातात त्याबद्दल वैज्ञानिक दृष्टिकोनातून माहिती दिली. या प्रबोधन सत्राचे प्रास्ताविक प्रा. राहुल राऊत यांनी तर संचालन पल्लवी आत्राम यांनी केले. तर आभार प्राची डुकरे या विद्यार्थिनीने मानले. यावेळी मार्गदर्शक म्हणून रासेयो अधिकारी प्रा. संतोष मोहदरे, प्रा. दशरथ साटोने यांच्यासह रासेयो स्वयंसेवक आणि गावातील युवक उपस्थित होते.

Hello Wardha
Page No. 3 Jan 12, 2023
Powered by: erelego.com

# सोनेगांव आबाजी में रासेयो के निवासी शिविर का आयोजन




ब्यूरो। वर्धा. रातुम नागपुर विव संलग्न यशवंत ग्रामीण शिक्षा संस्था द्वारा संचालित एसएसएनजे कॉलेज देवली के रासेयो का विशेष निवासी शिविर 5 से 11 जनवरी तक सोनेगांव आबाजी में आयोजित किया गया है। इस शिविर का उद्घाटन आबाजी महाराज देवस्थान में यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था के अध्यक्ष समीर देशमुख ने किया। प्रमुख अतिथि के रूप में आबाजी महाराज देवस्थान के अध्यक्ष जयंत येरावार, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले, वनिता डफरे, सरपंच गंगाधर राऊत, सुभाष होरे, मनोज दिघीकर, अंकित भोयर, अमोल चोरे आदि उपस्थित थे। प्रस्तावना प्रा.संतोष मोहदरे ने रखी। संचालन डॉ.नीलिमा वर्गड ने तथा आभार प्रदर्शन राहुल राऊत ने किया।

दैनिक भास्कर
Wed, 11 January 2023
https://epaper.bhaskarhindi

**तरुण भारत**

Paschim Vidarbha | 2023-01-31 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनता जागृत व्हावी : समीर देशमुख

◆ वर्धा, ३० जानेवारी

श्रमप्रतिष्ठेबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनता जागृत व्हावी, अशी अपेक्षा राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरात यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी व्यक्त केली. एसएसएनजे महाविद्यालय देवळी आणि सोनेगाव आबाजी येथील ग्रामस्थांच्या वतीने 'युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास' या संकल्पनेवर आधारित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते.

या शिबिरात रोज सामुदायिक प्रार्थना, प्राणायाम, योगासने, प्रभातफेरी, जागर गीते, पोस्टाक्य, श्रमदान, प्रबोधनसत्र, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

या शिबिरात प्रबोधन सत्रामध्ये शेषराव बावनकर यांनी युवकांपुढील आव्हाने व उपाय, सुमित उरकुडकर यांनी ट्रुथ फॉर यूथ, डॉ. संदीप काळे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दशा आणि दिशा, सतीश दाणी यांनी ग्रामीण युवक व शेती, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, विजय ओझा यांनी एकआमदही आणि युवक, अमोल गाढवकर यांनी स्वामी विवेकानंद व आजचा युवक, सामाजिक सशक्तीकरण शैक्षणिक संस्थेचे सचिव प्रा. राहुल राऊत यांनी स्पर्धा परीक्षा आणि आजचे तरुण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले.

या शिबिरात गावकऱ्यांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच वैशाली येरावार यांच्या अध्यक्षतेखाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गावातील समस्या जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्रामसर्वेक्षण केले.

◂(तभा वृत्तसेवा)

# श्रमप्रतिष्ठेबरोबरच मनात सृजनता जागृत व्हावी : समीर देशमुख

▸ सकाळ वृत्तसेवा



वर्धा, ता. १८ : श्रमप्रतिष्ठेबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनात सृजनता जागी व्हावी, असे यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख म्हणाले. ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते.

एस.एस.एन.जे महाविद्यालय देवळी आणि सोनेगाव आबाजी यांच्या संयुक्त विद्यमाने रा.से.यो. योजनेचे युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या संकल्पनेवर आधारित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर सोनेगाव आबाजी या ग्रामस्थांनी आयोजित केले होते. या सात दिवसीय शिबिरात रोज सामुदायिक प्रार्थना, प्राणायाम, योगासने, सकाळी प्रभात फेरी, जागर गीते, पोस्टवाक्य, श्रमदान, प्रबोधन सत्रे, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम केले. शिबिरात प्रबोधन सत्रामध्ये शेषराव बावनकरांनी युवकांपुढील आव्हाने व उपाय, सुमित उरकुडकर यांनी ट्रुथ फॉर यूथ, डॉ. संदीप काळे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दशा आणि दिशा, सतीश दाणी यांनी ग्रामीण युवक व शेती, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, विजय ओझा यांनी एक अ व्ही आणि युवक, अमोल गाढवकर यांनी स्वामी विवेकानंद व आजचा युवक, सामाजिक सशक्तीकरण शैक्षणिक संस्थेचे सचिव प्रा. राहुल राऊत यांनी स्पर्धा परीक्षा आणि आजचे तरुण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी प्रबोधन सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. गावकऱ्यांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा यांच्या सौजन्याने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच वैशाली येरावार यांच्या अध्यक्षतेखाली महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले, जयवंतराव येरावार, वणीता डफरे, किशोर राऊत, श्याम भोयर, महादेवराव निकम, ज्ञानेश्वर भोयर, मनोज दिपीकर, अंकित भोयर, प्रा. राहुल राऊत यांनी सहकार्य केले.

**तरुण भारत**

Paschim Vidarbha | 2023-01-12 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# ग्रामीण भागातील युवकांमध्ये संघर्षाची क्षमता जास्त : उरकुडकर

**श्रमसंस्कार निवासी शिबिर**



उरकुडकर यांचे स्वागत करताना विद्यार्थिनी

◆ वर्धा, ११ जानेवारी

युवकांनी तत्त्वाकडेच माध्या विरुद्ध जगावे, ज्यामुळे येणारे भविष्य उज्ज्वल होईल. ग्रामीण भागातील युवकांमध्ये संघर्ष करण्याची क्षमता जास्त असते, असे प्रतिपादन ट्रुथ फॉर यूथ या विषयावर उद्बोधन करताना सुमित उरकुडकर यांनी केले.

एस. एस. एन. जे. महाविद्यालय देवळी आणि सोनेगाव (आबाजी) ग्रामस्थांच्या संयुक्त वतीने युवकांचा ध्यास ग्राम-शहर-विकास या संकल्पनेवर आबाजी महाराज देवस्थान सोनेगाव (आ.) येथे ५ ते ११ जानेवारी या कालावधीत आयोजित राष्ट्रीय योजनेच्या श्रमसंस्कार निवासी शिबिरात ते बोलत होते. यावेळी डॉ. शेषराव बावनकर, प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले आदींची उपस्थिती होती.प्रबोधन सत्रामध्ये युवकांपुढील आव्हाने व उपाय या विषयावर डॉ. शेषराव बावनकर यांनी सर्वधर्म समभाव, मानसिक एकाग्रता, संघटन कौशल्य ही मूल्ये बोधकथा आणि उदाहरणे देऊन विशद केली. संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयासंबंधी प्राचार्य डॉ. प्रभाकर ढाले यांनी मराठी संत साहित्याची महती विशद करून संतांबद्दल जे चमत्कार सांगितले जाते त्याबद्दल वैज्ञानिक दृष्टिकोनातून अनेक उदाहरणांच्या माध्यमातून उलगडून दाखवले. प्रबोधन सत्राचे प्रास्ताविक प्रा. राहुल राऊत, संचालन पल्लवी आवारे यांनी केले तर आभार प्राची ढुकरे हिने मानले. यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रा. संतोष मोहदरे होते. कार्यक्रमाला प्रा. साटोणे, रासेयो स्वयंसेवक आणि गावातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◂(तभा वृत्तसेवा)

# रासेयो विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रसेवा विकसनाचे एक साधन

## समीर देशमुख यांचे प्रतिपादन : संत केजाजी भक्त निवासात विशेष शिबिराचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

सेलू : राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रसेवा विकसनाचे मूलभूत साधन असून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात सामाजिक कार्य व सामाजिक दायित्व यांची जाणीव करून देते. तसेच रासेयो शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी मोलाची मदत होते, असे मत यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी व्यक्त केले.



येथील यशवंत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संत केजाजी महाराज भक्त निवास, घोराडमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी डी.बी. पानबुडे व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना डहाणे यांची उपस्थिती होती.

गावागावांमध्ये शिबिराचे आयोजन करून ग्रामस्थांची मदत करावी, असे आवाहनही समीर देशमुख यांनी स्वयंसेवकांना केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक अडचणी असेल तर त्या सोडविण्यासाठी आम्ही सहकार्य करू, अशी ग्वाही गटविकास अधिकारी पानबुडे यांनी दिली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डहाणे यांनी केले तर अहवाल वाचन शीतल बावीस्काळे यांनी केले. शिबिरादरम्यान डॉ. प्रशांत वाडीभस्मे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. नागरिकांकरीता दंतरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर घेतले. याकरिता विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाने सहकार्य केले. डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. राम सवंडकर व किशोर ढगे यांनी मार्गदर्शन केले. संचालन निकिता महाकाळकर तर आभार डॉ. संदीप काळे यांनी मानले.

# राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रसेवा विकसनाचे साधन : समीर देशमुख

देशोन्नती वृत्तसंकलन...

सेलू ■ राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रसेवा विकसनाचे मूलभूत साधन असून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात सामाजिक कार्य व सामाजिक दायित्व यांची जाणीव निर्मितीसाठी अनन्य साधारण आहे. तसेच रासेयोचे विशेषतः शिबिर विद्यार्थ्यांना सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मंच म्हणून उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा परिपूर्ण अवलंब करावा, असे मत यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी रासेयो शिबिराच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले.

यशवंत महाविद्यालय सेलू, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर संत केजाजी महाराज भक्त निवास, घोराड येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिराचा समारोपीय कार्यक्रम समीर देशमुख (अध्यक्ष, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून डी. बी. पानबुडे (गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सेलू) व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना डहाणे उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमात समीर देशमुख यांनी शिबिरातील स्वयंसेवकांचे अभिनंदन केले, त्यांना मार्गदर्शन केले. गावागावांत जाऊन श्रम द्यावा आणि नागरिकांना मदत करावी



अशी आशा व्यक्त केली. शिबिरातून घेतलेल्या मार्गदर्शनाचा तुम्ही तुमच्या आयुष्यात फायदा करून घ्यावा अशा शुभेच्छा दिल्या.

डी. बी. पानबुडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता अडचणी आल्यास आम्ही मार्गदर्शन करण्यास तयार आहोत, अशी ग्वाही दिली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अर्चना डहाणे, शिबिराचे अहवाल वाचन शीतल बावीस्काळे यांनी केले. शिबिरात क्षयरोग विभागाचे डॉ. प्रशांत वाडीभस्मे आणि त्यांचे इतर सहकारी यांनी विद्यार्थ्यांना क्षयरोगावर जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच घोराड व इतर गावातील नागरिकांकरिता दंतरोग निदान व सामान्य आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. याकरिता विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सेलू यांच्या संपूर्ण टीमने शिबिरात सहकार्य केले. ता.प्र.

**13. राष्ट्रीय मतदार दिन (23/01/2023 – 25/01/2023)**

**विद्यार्थ्यांची रॅली, रांगोळी पोस्टर स्पर्धा व सामूहिक प्रतिज्ञा.**

**एस एस एन जे महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन (नवमतदार जागृती रॅलीचे आयोजन, राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम)**

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त एस एस एन जे महाविद्यालयात विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, घेण्यात आली. तहसील कार्यालयात देवळीमार्फत मिळालेल्या दिशा निर्देशानुसार नव मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांचे सतरा वर्ष पूर्ण झाली व 18 वर्षे पूर्ण होऊन मतदार यादीत नाव नाही अशा सर्वांसाठी महाविद्यालयात मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराची सुरुवात 23 जानेवारी पासून करण्यात आली. या नव मतदार नोंदणी शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करून त्या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले.

महाविद्यालयात व सभोवतालच्या परिसरात वातावरण निर्मिती करण्यासाठी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले त्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.




**नवमतदार जागृती रॅलीचे आयोजन**




**प्राचार्य डॉ. ढाले सर**




**राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम**




**पोस्टर स्पर्धेची पाहणी करतांना डावीकडून उपजिल्हाधिकारी व तहसीलदार**




**तहसील कार्यालय, देवळीमार्फत पोस्टर स्पर्धेची पाहणी, प्राचार्य डॉ. ढाले सर**



**नव मतदार नोंदणी शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला**

**14. जागतिक महिला दिन**

**०८ मार्च २०२३**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागात द्वारा ८ मार्च 2023 ला जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य ढाले सर अध्यक्ष होते. या दिनानिमित्त महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षकांचे व महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देउन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक यांनी आपले महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले.




